सकाळ

Date :- 06/09/2023

Page :- 2




चिपळूण : बौद्धिक संपदा हक्क विषयावर मार्गदर्शन करताना मान्यवर.

# 'बौद्धिक संपदा हक्क'वर व्याख्यान

चिपळूण, ता. ५ : खेड तालुक्यातील लोटे येथील एमईएस कॉलेज ऑफ नर्सिंगतर्फे 'बौद्धिक संपदा हक्क' विषयावर व्याख्यान झाले. बुद्धिमत्तेला मालमत्तेच्यादृष्टीने पाहणे आणि तिचे मालमत्तेसारखे रक्षण करणे या मार्गाने अनेक देश गर्भश्रीमंत झाले आहेत. हा बौद्धिक मालमत्ता हक्क नेमका काय आहे, याची सविस्तर माहिती विद्यार्थी व शिक्षकांना व्हावी. त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदाव्यात, संशोधन क्षेत्रात त्यांनी अग्रेसर राहावे, या हेतूने व्याख्यानाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष ॲड. सागर नेवसे, संचालक डॉ. शामसुंदर भाकरे, ॲड. विद्याधर कुलकर्णी, ॲड. गणेश हिंगमिरे, प्राचार्य मिलिंद काळे, उपप्राचार्य प्रा. शिवप्रसाद हळेमनी आदींच्या उपस्थितीत झाले. ॲड. विद्याधर कुलकर्णी यांनी बौद्धिक संपदा हक्क म्हणजे काय? तसेच पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क व इंडस्ट्रियल डिझाईन म्हणजे काय, त्यांच्याशी निगडित कायदे आदींची माहिती दिली. ॲड. गणेश हिंगमिरे यांनी बौद्धिक संपदा हक्काविषयी महत्त्व सांगत तरुणांसमोरील आव्हाने सांगितली तसेच संशोधनाची गरज स्पष्ट करत त्याची सुरवात कशी होऊ शकते, त्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची गरज स्पष्ट केली. ॲड. डॉ. ज्योती भाकरे यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये बौद्धिक संपदा हक्काचा वापर कसा झाला, यापुढे त्याचा वापर कसा केला जाऊ शकतो, या विषयी माहिती दिली.

On 6th September 2023, A News artical was Published at 'Sakala' leading news paper in Marati language regarding conference organised by MES College of Nursing on Intellectual Property Rights on 1st September 2023.

True Copy

Principal
M.E.S. College of Nursing
Ghanekhunt - Lote, Tal. Khed,
Dist. Ratnagiri - 415 722